# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी शहादा भाग शहादा
# जि. नंदुरबार यांचे कार्यालय

दुरध्वनी क्रमांक – (02565) 227733
ई-मेल आय. डी – sdm.shahada@gmail.com

पत्ता - जुने तहसिल कार्यालय आवार,
शहादा ता. शहादा जि. नंदुरबार – 425409

| क्रमांक/आस्था/कावि/ **182 / 2026** | **आस्थापना शाखा** | दिनांक 06-10-2026 |
|---|---|---|

**ई-ऑफीसने / ई-मेलने / तात्काळ**

**प्रति,**

1. तहसिलदार शहादा / अक्राणी
2. गटविकास अधिकारी पंचायत समिती शहादा / अक्राणी
3. मुख्याधिकारी, नगर पालिका शहादा
4. मुख्याधिकारी, नगर पंचायत धडगाव
3. ग्राम महसूल अधिकारी (संबंधित रिक्त पद) ता. शहादा / अक्राणी

**विषय:- महसूल सेवक (कोतवाल) पदभरती-2026 जाहिरात प्रसिध्द करणेबाबत..**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते कि, महसूल सेवक (कोतवाल) पदभरती-2026 कामी दिनांक 29/09/2026 रोजी तहसिल कार्यालय शहादा येथील सभागृहात तसेच दिनांक 30/09/2026 रोजी तहसिल कार्यालय अक्राणी येथील सभागृहात महसूल सेवक (कोतवाल) पदभरती संदर्भात आरक्षण सोडत काढून समांतर आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने, सदर आरक्षण निश्चितीनुसार शहादा उपविभागाची महसूल सेवक (कोतवाल) पदभरती-2026 ची जाहिरात यासोबत पाठविण्यात येत असुन सदर जाहिरात प्रसिध्द करणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल खास दुताकरवी सादर करण्यात यावा.

1. तहसिलदार शहादा / अक्राणी यांनी आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर सदर जाहिरातीची व्यापक प्रसिध्दी करून प्रसिध्दीबाबत अहवाल ईकडील कार्यालयास खास दुताकरवी तसेच जाहिरातीस ग्राम महसूल अधिकारी मार्फत सजेअंतर्गत गावात प्रसिध्दी करून प्रसिध्दीबाबत अहवाल सादर करणेबाबत संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांना आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे.
2. गटविकास अधिकारी पंचायत समिती शहादा / अक्राणी यांनी आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर सदर जाहिरातीची व्यापक प्रसिध्दी करून प्रसिध्दीबाबत अहवाल ईकडील कार्यालयास खास दुताकरवी तसेच जाहिरातीस ग्रामसेवकमार्फत संबंधीत सजेत ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करून प्रसिध्दीबाबत अहवाल सादर करणेबाबत ग्रामसेवक यांना आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे.
3. मुख्याधिकारी नगर पालिका शहादा यांनी आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर सदर जाहिरातीची व्यापक प्रसिध्दी करून प्रसिध्दीबाबत अहवाल ईकडील कार्यालयास खास दुताकरवी सादर करावा.
4. मुख्याधिकारी नगर पंचायत, धडगाव यांनी आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर सदर जाहिरातीची व्यापक प्रसिध्दी करून प्रसिध्दीबाबत अहवाल ईकडील कार्यालयास खास दुताकरवी सादर करावा.
5. संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांनी आपल्या सजेअंतर्गत येणा-या प्रत्येक गाव/पाड्यावर सदर जाहिरातीची व्यापक प्रसिध्दी करून प्रसिध्दीबाबत अहवाल ईकडील कार्यालयास स्वत: सादर करावा.

**अध्यक्ष – महसूल सेवक पदभरती-2026 समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा**

**प्रत:-** 1. मा. जिल्हाधिकारी सो. नंदुरबार (कुळवहिवाट शाखा) यांना माहितीसाठी सविनय सादर.
2. जिल्हा माहिती अधिकारी नंदुरबार यांचेकडे प्रसिध्दीसाठी सादर.

**उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा यांचे कार्यालय, जिल्हा नंदुरबार**
**महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील पद भरतीसाठी जाहीरात 2026**
(जाहिरात क्रमांक 01/2026)

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा उपविभागातील शहादा व अक्राणी तालुक्यातील सजांचे महसूल सेवक (कोतवाल) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता अर्हता धारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच **https://nandurbar.bhartiportal.org** या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

मा. शासनाकडील पत्र क्र.पदभ-2025/प्र.क्र.98/आस्था-10 दिनांक 19 ऑगस्ट, 2026 अन्वये सन 2026 महसूल सेवक (कोतवाल) पदभरती बाबत महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे.

शहादा तालुक्यातील महसूल सेवक (कोतवाल) (तात्पुरत्या स्वरुपात) रिक्त पदे :- 10

अक्राणी तालुक्यातील महसूल सेवक (कोतवाल) (तात्पुरत्या स्वरुपात) रिक्त पदे :- 07

| ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 06/10/2026 रोजी सकाळी 10.00 पासून | दिनांक 21/10/2026 रोजी सायंकाळी 05.45 पर्यंत |

**ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक 21/10/2026**

महसूल सेवक (कोतवाल) भरती-2026 प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहीरात **https://nandurbar.bhartiportal.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहिती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरून विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत ऑनलाईन पेमेंट गेटवे द्वारे भरलेले परीक्षाशुल्क ग्राह्य धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, शहादा भाग शहादा यांना राहतील.

दिनांक: 06/10/2026

(दिपक गिरासे)
**अध्यक्ष — महसूल सेवक पदभरती-2026 समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा**

उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा

# महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील पद भरतीसाठी जाहीरात 2026

(जाहिरात क्रमांक 01/2026)

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा उपविभागातील शहादा व अक्राणी तालुक्यातील सजांचे महसूल सेवक (कोतवाल) या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता अर्हता धारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच **https://nandurbar.bhartiportal.org** या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

मा. शासनाकडील पत्र क्र.पदभ-2025/प्र.क्र.98/आस्था-10 दिनांक 19 ऑगस्ट, 2026 अन्वये सन 2026 महसूल सेवक (कोतवाल) पदभरती बाबत महसूल सेवक (कोतवाल) संवर्गातील रिक्त असलेली पदे भरण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे.

| ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 06/10/2026 रोजी सकाळी 10.00 पासून | दिनांक 21/10/2026 रोजी सायंकाळी 05.45 पर्यंत |

**ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक 21/10/2026**

महसूल सेवक (कोतवाल) भरती-2026 प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहीरात **https://nandurbar.bhartiportal.org** या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहिती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरून विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत ऑनलाईन पेमेंट गेटवे द्वारे भरलेले परीक्षाशुल्क ग्राह्य धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया / परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, शहादा भाग शहादा यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

**रिक्त पदांचा तपशिल :-**

1. महसूल सेवक (कोतवाल) (निव्वड तात्पुरत्या स्वरूपात) दरमहा मानधन रक्कम रु. 16500/- अक्षरी (रूपये सोळा हजार पाचशे फक्त) इतके शासन निर्णय महूसल व वन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2024/प्र.क्र./292/ई-10 दिनांक 07/10/2024 अन्वये

| अ. क्र. | तालुका | सजा | सजेतील गांवे | सजेस असलेले आरक्षण | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शहादा | राणीपुर | राणीपुर, पिंप्राणी, चिरडे, कोटबांधणी, नागझिरी | अराखीव | महिला |
| 2 | शहादा | कर्जोत | कर्जोत, कलमाड त.ह, तिधारे, लोहारे | अराखीव | सर्वसाधारण |
| 3 | शहादा | असलोद | असलोद, न्यु असलोद, दुधखेडा पिंपर्डे | अराखीव | सर्वसाधारण |
| 4 | शहादा | गणोर | गणोर, खरगोन, टवळाई, आडगाव, मुबारकपुर | अराखीव | सर्वसाधारण |
| 5 | शहादा | दामळदा | दामळदा, गोगापुर, चिखली खुर्द | अराखीव | सर्वसाधारण |
| 6 | शहादा | लंगडी | लंगडी, चांदसैली, मलगाव, मानमोड्या, शहाणा, भुलाणे | अराखीव | सर्वसाधारण |
| 7 | शहादा | लोणखेडा | लोणखेडा, पुरूषोत्तमनगर, टेंभली | अराखीव | सर्वसाधारण |
| 8 | शहादा | वैजाली | वैजाली, करणखेडा. | अराखीव | महिला |
| 9 | शहादा | अनरद | अनरद, पुसनद | इतर मागासवर्ग | सर्वसाधारण |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 10 | शहादा | नांदरखेडा | नांदरखेडा, पळासवाडा, वर्ढे त.श. | भटक्या जमाती-क | सर्वसाधारण |
| 11 | अक्राणी | बोरवण | बोरवण, खरवड, चोंदवाडे बु., चोंदवाडे खु., अंबारी, बिलबारपाडा | अराखीव | महिला |
| 12 | अक्राणी | तोरणमाळ | जुने तोरणमाळ, नवे तोरणमाळ, केलापाणी, झापी, कुंड्या, भादल, उडद्या | अराखीव | सर्वसाधारण |
| 13 | अक्राणी | गोरंबा | गोरंबा, वेलखेडी, जुगणी, मोडलगांव | अराखीव | सर्वसाधारण |
| 14 | अक्राणी | खुंटामोडी | खुंटामोडी, कुंडल, खांडबारा, मोजरा, कात्री रे, कात्री फॉ, माकडकुंड, पौला | अराखीव | सर्वसाधारण |
| 15 | अक्राणी | रोषमाळ बु. | रोषमाळ बु., वडफळ्या, जुने धडगाव, हरणखुरी, भुजगांव | अराखीव | महिला |
| 16 | अक्राणी | खर्डा | खर्डा, हातधुई, वरखेडी बु., वरखेडी खु., टेंबला | अराखीव | सर्वसाधारण |
| 17 | अक्राणी | दुट्टल | दुट्टल, चिंचखेडी, नळगव्हाण, बोरसिसा, निमगव्हाण, सुरुंग | अराखीव | सर्वसाधारण |

उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ठराव क्र. पीकेए/1051/ल-6, दिनांक 07/05/1959 प्रमाणे (महसूल सेवक) कोतवालांच्या नेमणूका व नोकरी याबाबत अटी व शर्ती उमेदवारांवर बंधनकारक राहतील. तसेच महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी इच्छूक उमेदवार पुढील नमूद केलेल्या अटीस पात्र असणे आवश्यक आहे.

1) महसूल सेवक (कोतवाल) भरतीसाठी दिनांक 06/10/2026 रोजी उमेदवाराचे वय किमान 18 वर्ष व कमाल 40 वर्ष असावे.
2) अर्जदार यांनी ज्या **सजेतील पदासाठी** अर्ज सादर केला आहे, त्याच सजातील अंतर्भूत असलेल्या गावांमधील अर्जदार स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे. त्याबाबतचा पुरावा अर्ज भरतेवेळी आवश्यक राहील.
3) महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक अर्हता इयत्ता 4 थी उत्तीर्ण इतकी असावी.
4) अर्जदार हा महसूल सेवक (कोतवाल) पदाची कर्तव्ये पार पाडण्यास शारीरिकदृष्टया सक्षम असावा.
5) मागासवर्गीय उमेदवाराने पुरावा म्हणून सक्षम प्राधिका-यांने दिलेले जात प्रमाणपत्र छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.
6) अर्जदार व्यक्ती विरुद्ध कोणत्याही गुन्ह्याची नोंद झालेली नसावी अथवा उमेदवारास कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी. याबाबत संबंधित पोलीस स्टेशनचा दाखला छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.
7) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.केओटी-6073/30004/ल, दिनांक 28/02/1974 नुसार महसूल सेवक (कोतवाल) म्हणून नेमणूक करतांना इतर सर्व गोष्टी बरोबर असतील तर त्या सजेतील पुर्वीच्या महसूल सेवक (कोतवाल) च्या वारसांना इतर उमेदवारांपेक्षा प्राधान्य देण्यात येईल. तसेच महसूल सेवक (कोतवाल) च्या वारसाव्यतिरिक्त इतर दोन उमेदवारांचे अंतिम गुण सारखे असल्यास उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 13 जुन 2018 मधील नमुद निकषावर लावला जाईल.
8) महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी नियुक्ती देण्याकामी उमेदवारास लेखी परिक्षेत किमान 40 गुण मिळवणे आवश्यक असेल.
9) अर्जदार उमेदवारास वर नमुद केलेल्या पात्रतेसह लेखी किमान गुणवत्ता प्राप्त करावी लागेल.

10) उमेदवारांना लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणाच्या आधारे मुळ कागदपत्रे तपासणीकामी तात्पुरती निवड यादी तहसिल कार्यालयात प्रसिध्द करण्यात येईल तसेच कागदपत्रे तपासणी अंती अंतिम निवड यादी तहसिल कार्यालयात प्रसिध्द करण्यात येईल.

11) उमेदवारांना लेखी परिक्षेला व कागदपत्रे पडताळणीकामी उपस्थित राहण्यासाठी कोणताही प्रवास खर्च व इतर खर्च दिला जाणार नाही.

12) उमेदवार अनुसूचित जाती/जमाती व खुल्या प्रवर्गातील उमेदवाराव्यतिरिक्त असल्यास अशा उमेदवारांना प्रगत उन्नत गटात मोडत नसलेबाबत सक्षम अधिका-याचे (नॉन क्रिमीलेअर) 31 मार्च 2027 पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र कागदपत्र छाननीचे वेळी जोडणे आवश्यक राहील. असे प्रमाणपत्र छाननी वेळी सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.

13) भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रिया पूर्ण होईपावेतो सुधारित शासन निर्णय/परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

14) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम 2005 मधील 4 मधील तरतुदीनुसार कुटुंबात दिनांक 28/03/2005 नंतर जन्मलेल्या मुलामुळे एकुण अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक नाहीत याबाबतचा नमुना-अ मधील कागदपत्रांची छाननीवेळी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

15) अर्ज पुर्ण माहितीसह व अचूक भरावा, त्यात नमूद करणेत आलेली सर्व माहिती खरी असणे बंधनकारक आहे.

❖ **परिक्षेचे स्वरुप**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | लेखी परिक्षेसाठी गुण |
|---|---|---|
| 1 | महसूल सेवक (कोतवाल) (तात्पुरत्या स्वरुपात) | 100 |

उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा

❖ **लेखीपरिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे व उत्तरपत्रिकेचे स्वरुप व कार्यक्रम**

1) लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. (प्रश्नसंख्या 50)
2) महसूल सेवक (कोतवाल) (तात्पुरत्या स्वरुपात) पदाची लेखी परीक्षा सामान्य ज्ञानावर आधारीत असेल.
3) उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळप्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
4) उमेदवारास लेखी परिक्षेत किमान 40 गुण मिळवणे आवश्यक असेल.
5) लेखी परीक्षेत गुणवत्तेनुसार पात्र ठरणा-या उमेदवाराची तात्पुरती कागदपत्र तपासणीकामी निवड यादी संबंधीत तहसिल कार्यालयात प्रसिध्द करण्यात येईल. तसेच कागदपत्र तपासणी अंती अंतिम निवड यादी संबंधीत तहसिल कार्यालयात प्रसिध्द करण्यात येईल.
6) लेखी परिक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संबंधित तहसिल कार्यालयातच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संबंधित तहसिल कार्यालयात भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

7) तसेच परिक्षेपूर्वी **संकेतस्थळावरुन** प्रवेशपत्र दिनांक 04/11/2026 ते 10/11/2026 या कालावधीत **डाऊनलोड** करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. **सदर प्रवेशपत्रावरच उमेदवारास परिक्षेकरीता प्रवेक्ष दिला जाईल यांची नोंद घ्यावी.**

❖ **निवडीसाठी कार्यपद्धती, अटी, शर्ती.**

1) लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
2) लेखी परीक्षेअंती पात्र उमेदवारांचे जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, मूळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिद्ध होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपुर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशा उमेदवारांचे मागीतलेले सामाजिक आणि/किंवा समांतर आरक्षण अथवा प्रक्रिया शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.
3) उमेदवार शारिरीक दृष्ट्या सक्षम असल्या बाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल व उमेदवाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
4) उमेदवाराचे चारित्र्य निष्कलंक असल्या बाबतचे संबांधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.
5) कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंध न ठेवणेबाबतचे रुपये 100/- च्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल.
6) उमेदवाराने अर्ज केलेल्या **सजेतील गावातील स्थानिक रहिवासी** असणे आवश्यक.
7) प्रत्येक सजेत केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषांनुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करताना उमेदवाराने आरक्षण तपासूनच अर्ज करावा.
8) संपुर्ण शहादा व अक्राणी तालुक्यासाठी महसूल सेवक (कोतवाल) पदांसाठी एकाच दिवशी एकाच वेळी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल.
9) संपुर्ण भरती प्रक्रिया सजेनिहाय होणार असून कोणत्याही दोन सजेच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.
10) महसूल सेवक (कोतवाल) हे पद वर्गीकृत नाही.
11) महसूल सेवकांना (कोतवालांना) क्षेत्रिय स्तरावर (Field Work) काम करावे लागते त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारिरीक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगांसाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.
12) महसूल सेवक (कोतवाल) हे पद एका सजेत एकच असते. त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षण लागू नाही.
13) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब दि. 12/12/2011 मधील तरतुदीनुसार याचिका क्र. 2136/2011

व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 06 महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

14) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे सन 2026-27 पर्यंत वैध असलेले नॉनक्रिमीलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉनक्रिमीलेअरचे तत्व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागासप्रवर्गांना लागू राहील.

15) महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्रचे अधिवासी **(Domiciled)** असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. महिला 2023/प्र.क्र.223/कार्या-2 दि. 4 मे 2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदावरती निवडीकरिता नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडुन वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

16) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही 2000/प्र.क्र.17/2000/12, दि.28/03/2005 व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही 2000/ प्र.क्र.17/2000/12 दि. 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 अन्वये दि. 28/03/2005 रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत**

1. प्रस्तुत पदांकरीता फक्त **https://nandurbar.bhartiportal.org** या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आय. डी. व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रीये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबादारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आय.डी. व मोबाईल संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना उपविभागीय अधिकारी कार्यालय, शहादा भाग शहादा हे जबाबदार असणार नाही. सदर

संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

2. पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज **https://nandurbar.bhartiportal.org** या वेबसाईटद्वारे दिनांक 06/10/2026 रोजी सकाळी 10.00 पासून ते दिनांक 21/10/2026 रोजी सायंकाळी 05.45 पर्यंत या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.
3. उमेदवारांचे अर्ज **ऑनलाईन (Online)** पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे, हमीपत्रे **तसेच उमेदवार हा रिक्त पद असलेल्या सजे अंतर्गत गावातील रहिवासी असलेबाबतचा संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांचा दाखला/प्रमाणपत्र** अपलोड करणे **अर्जदारास बंधनकारक राहील.** तसेच, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.
4. उमेदवाराची लेखीपरीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखीपरिक्षेच्या गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार मुळ कागदपत्रे पडताळणीकामी यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार उपविभागीय अधिकारी, शहादा भाग शहादा यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.
5. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना **https://nandurbar.bhartiportal.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
6. संकेतस्थळावर, ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर खालीलपैकी कोणत्याही एक पध्दतीने प्रक्रीया शुल्क भरता येईल.

नेटबँकिंग / डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड / गुगल पे / फोन पे, द्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रक्रीया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बॅकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.

ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरणाऱ्या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची खात्री करुन घ्यावी. प्रक्रीया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग / डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड / गुगल पे / फोन पे वापरुन होणाऱ्या व्यवहारांची जबाबदारी संपुर्णत: उमेदवाराची आहे व उपविभागीय अधिकारी कार्यालय, शहादा भाग शहादा यास जबाबदार नाही.

7. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन **https://nandurbar.bhartiportal.org** या संकेतस्थळावरावरील सूचनेनूसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.
8. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळे नंतर ब अर्ज स्विकारला जाणार नाही.
9. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परिक्षाकेंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती दिलेल्या संकेतस्थळ (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
10. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचति जमाती (विमुक्तजाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वैध असलेले (अद्यावत अर्थात 31/03/2027 पर्यंत वैध असलेले) (नॉनक्रिमिलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
11. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 28 मार्च 2005 व शासन परिपत्रक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, 01 जुलै 2005 नुसार विहित केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
12. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच, नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
13. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी /नियुक्ती रद्द करण्यांत येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल
14. अपात्र अर्जदारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार नाही.
15. परीक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा

16. वरील अटी, शर्ती, नियमांव्यतिरीक्त शासनाने तसेच अध्यक्ष निवड समिती यांनी वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

❖ **परिक्षेचे शुल्क**

| अ.क्र | पदनाम / संवर्ग | परीक्षा शुल्क | |
|---|---|---|---|
| | | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग |
| 1 | **महसूल सेवक (कोतवाल) (तात्पुरत्या स्वरुपात)** | 600/- | 500/- |

❖ **रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे**

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | कालवधी |
|---|---|---|
| 1 | जाहीरात प्रसिध्दी | दि. 06/10/2026 |
| 2 | ऑनलाईन अर्ज स्विकृती कालावधी | दि. 06/10/2026 सकाळी 10.00 पासून ते 21/10/2026 रोजी सायंकाळी 05.45 पर्यंत |
| 3 | ऑनलाईन पध्दतीने प्रक्रीया शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दि. 21/10/2026 |
| 3 | अर्ज छाननी | दि. 22/10/2026 ते 01/11/2026 |
| 5 | प्रवेशपत्र उपलब्ध (हॉल टिकीट) | दि. 04/11/2026 ते 10/11/2026 |
| 6 | परिक्षा दिनांक | दि. 15/11/2026 |
| 7 | उत्तरसूची आणि निकाल घोषणा | दि. 16/11/2026 |
| 8 | दस्तऐवज पडताळणी | दि. 17/11/2026 ते 27/11/2026 |
| 9 | नियुक्तीपत्र | दि. 28/11/2026 |

❖ विशेष सूचना :-

- **या पदाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना उमेदवारांना अर्जात नमूद केलेली सर्व कागदपत्रे अर्जदार यांना जोडणे आवश्यक राहील. तसेच ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करू नयेत.**
- अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी संबधित तहसिल कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.

**दिनांक** :- 06/10/2026

(दिपक गिरासे)
**अध्यक्ष — महसूल सेवक पदभरती-2026 समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा**

उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा

**प्रत:- मा. जिल्हाधिकारी नंदुरबार (कुळकायदा शाखा) यांना माहितीस्तव सविनय सादर**

**प्रत:- तहसिलदार शहादा / अक्राणी यांना आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना**

**प्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा / अक्राणी यांना आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना**

**प्रत:- ग्राम महसूल अधिकारी ...................... ता. शहादा / अक्राणी जि. नंदुरबार**

2/- उपरोक्त जाहिरनामा आपले अधिनस्त गांवी तलाठी चावडीचे नोटीस बोर्डावर डकवुन व दवंडी देऊन प्रसिध्दी दिल्याबाबतचा अहवाल 2 दिवसांत या कार्यालयास सादर करावा.

दिनांक :- 06/10/2026

उपविभागीय अधिकारी ★ शहादा भाग शहादा ★

(दिपक गिरासे)
अध्यक्ष — महसूल सेवक पदभरती-2026 समिती
तथा उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा